दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १७६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२१ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# नेरळमध्ये एकाच रात्री फोडली नऊ दुकाने

**दै.रायगड नगरी । गणेश पवार**

**कर्जत : नेरळ रेल्वे स्थानकालगत कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या नऊ दुकानांमध्ये १९ सप्टेंबरच्या पहाटे चोरीच्या घटना घडल्या आहेत.**

**सुट्ट्या पैशांची चिल्लर आणि खाद्य पदार्थ यांच्यावर चोरट्यांनी डल्ला मारला असून नेरळ पोलिसांच्या कार्यक्षमतेबद्दल यामुळे संभ्रम निर्माण झाला आहे.**





नेरळ पोलीस ठाण्याचे हद्दीतील नेरळ रेल्वे स्टेशन लगत प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. त्या मार्गावर कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत मागील काही वर्षात रस्त्याच्या जागेत अतिक्रमण करून दुकाने थाटली आहेत. बांधकाम करून उभ्या राहिलेल्या त्या दुकानांमध्ये व्यवसाय करणाऱ्या नऊ दुकानांना १९ सप्टेंबरच्या पहाटे चोरट्यांनी लक्ष्य केले. तेथील चिराग बेंगल स्टोर, कोमल साडी सेन्टर, बबलू टी स्टॉल आणि अन्य सहा अशा नऊ दुकानांमध्ये चोरी केली. लोखंडी शटर लोखंडी हत्याराने वाकवून त्या दुकानांमध्ये चोऱ्या केल्या आहेत. त्यानंतर या दुकानदारांनी सकाळी नेरळ पोलीस ठाण्यात जाऊन आपल्या दुकानात झालेल्या चोरीच्या घटनेची माहिती दिली. नेरळ पोलिसांनी तक्रार नोंद केली असून चोरट्यांनी त्या दुकानांमधून रोख रक्कम तसेच सुट्या पैशांची चिल्लर आणि खाद्य पदार्थ यांच्यावर ताव मारला आहे.पोलिसांनी त्याबाबत तपास सुरू केला असून नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि नेरळ रेल्वे स्थानक येथील सीसीटीव्ही कॅमेरे यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. चोरीची घटना झालेली दुकाने ही नेरळ रेल्वे स्टेशन लगत आणि नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र या दरम्यान असल्याने तेथील सीसीटीव्ही कॅमेरे हे चोरांना पकडण्यासाठी नेरळ पोलिसांच्या मदतीला येतील अशी शक्यता आहे. त्या दृष्टीने नेरळ पोलिसांनी तपास सुरू केला आहे, मात्र नव्याने नेरळ पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून दाखल झालेले पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांच्यासाठी नेरळ पोलीस ठाणे हद्दीत घडत असलेल्या घटना हे मोठे आव्हान बनले आहे. १८ सप्टेंबर रोजी बोरगाव कळंब येथे झालेला खून आणि त्यानंतर चोरीच्या घटना लक्षात घेता नेरळ पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# उरण पंचायत समितीच्या सभापतीपदी समिधा म्हात्रे बिनविरोध



**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण पंचायत समितीच्या सभापती पदी आवरे पंचायत समिती गणातील व उरण तालुक्यात सर्वाधिक मताधिक्याने निवडून आलेल्या सौ.समिधा निलेश म्हात्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडणुकीत शेकापच्या समिधा म्हात्रे यांचा रिक्त झालेल्या सभापती पदासाठी एकमेव उमेदवारी अर्ज दाखल असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी सौ.समिधा म्हात्रे यांच्या सभापती पदाची घोषणा केली आहे.

उरण पंचायत समितीचे मावळते सभापती यांनी मागील काही दिवसांपूर्वी सभापती पदाचा राजीनामा देऊन तो मंजूरही करण्यात आला होता. त्यानंतर रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी २० सप्टेंबर २०२१ रोजी उरण पंचायत समितीच्या सभापती पदाची निवडणूक घेण्याचे आदेश दिल्याने ही निवडणूक उरणचे तहसिलदार भाऊसाहेब यांच्या आधिपत्याखाली घेण्यात आली. २ वाजताचे सुमारास सौ.समिधा म्हात्रे यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सदस्याने उमेदवारी अर्ज न दाखल केल्याने त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा उरण पंचायत समितीच्या सभागृहात करण्यात आली.

उरण पंचायत समितीत एकूण ८ सदस्य संख्या असून शेकाप – ५, शिवसेना –२, भाजपा – १ असे पक्षीय बलाबल आहे.सुरवा–तीला नरेश घरत यांनी सभापतीपद भूषविले होते. त्यानंतर ॲड.सागर कडू यांनी हे पद भूषविले. सागर कडू यांनी राजीनामा दिल्यानंतर आता सभापती पदाची जबाबदारी सौ.समिधा म्हात्रे यांनी स्वीकारली आहे.समिधा निलेश म्हात्रे यांची निवड ही शेवटच्या ५ महिन्या करिता आहे. समिधा म्हात्रे आवरे येथील रहिवासी असून सौ.समिधा म्हात्रे यांची सभापती पदी बिनविरोध निवड झाल्याने शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला आहे. नागरिकांनी, जनतेने शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पुढील महिन्यापासून भारत पुरविणार संपूर्ण जगाला कोरोनाविरोधी लस

## केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची मोठी घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोरोनाविरोधातील लसीकरणाला सुरुवात झाल्यानंतर भारताने जगातील काही देशांना लसींचा पुरवठा केला होता. मात्र देशात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने थैमान घातल्यानंतर बाहेरील देशांना होणारा लसींचा पुरवठा थांबवण्यात आला होता. दरम्यान, आता पुढील महिन्यापासून भारत पुन्हा एकदा संपूर्ण जगाला कोरोनाविरोधातील लसींचा पुरवठा करणार आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी ही घोषणा केली आहे.

केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी याबाबतची घोषणा करताना आज सांगितले की, देशामध्ये कोरोना .../२

## संक्षिप्त...

### शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्राला जामीन मंजूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोर्टाने उद्योगपती आणि अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्राची पॉर्नोग्राफी प्रकरणात ५०,००० रुपयांच्या जातमुचलक्यावर सुटका केली आहे. आज अश्लील चित्रपट बनवल्याप्रकरणी न्यायालयाकडूनराज कुंद्राला जामीन मिळाला आहे. राज कुंद्रा २ महिने तुरुंगात होता. उद्या १०.३० वाजताच्या सुमारास कोर्टातील कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर राज कुंद्राची जेलमधून सुटका करण्यात येणार आहे. प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्रा बराच काळ तुरुंगात होता. राजविरोधात अश्लील चित्रपट बनवणे आणि ते ॲपवर सादर करणे हे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अलीकडेच मुंबई पोलिसांनी सुमारे १५०० पानांचे आरोपपत्रही दाखल केले होते. पण आता अखेर जामीन मिळाल्याने राज कुंद्राने सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. आतापर्यंत एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली असून, १३ जणांविरुद्ध ४ हजार ९९६ पानांचे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

# माथेरान नगरपरिषदेच्या दवाखान्यातील गलथान कारभारामुळे फोटोग्राफर तरुणाचा बळी

## डॉक्टरांच्या गैरहजेरीमुळे गमवावे लागले प्राण

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : काही वर्षांपूर्वी माथेरान मध्ये फोटोग्राफरचा व्यवसाय करन्यासाठी आलेले आणि अल्पावधीतच सर्वांशी आपुलकीने वा–गणारे नकीम हकीम शेख या तरुणाला दि.१९ रोजी हृदयविकाराचा तीव्र झटका आला असता माथेरान नगरपरिषदेच्या दवाखान्यात डॉक्टरांच्या गैरहजेरीमुळे वेळेत उपचार मिळू न शकल्यामुळे आपले प्राण गमवावे लागल्याची घटना घडली आहे. त्यामुळे गावात नगरपरिषदेच्या या गलथान कारभाराबाबतीत संताप व्यक्त केला जात आहे.

येथील शारलोट लेक या ठिकाणी नकीम शेख हे नेहमीप्रमाणे आपला फोटोग्राफीचा व्यवसाय करून घरी आल्यावर त्यांची तब्बेत अचानक बिघडली असता त्यांना दवाखान्यात उपचारासाठी नेण्यासाठी वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध होऊ शकली नाही. यामध्ये बराच वेळ वाया गेला त्यामुळे अत्यंत अडचणीचा भाग असणाऱ्या दाट वस्तीतील संत रोहिदास नगर येथून शेजारील मित्र परिवाराने त्यांना हातरीक्षा मधून दवाखान्यात नेले होते. परंतु त्याठिकाणी सुध्दा नव्याने रुजू झालेले डॉक्टर रॉय हे उपस्थित नव्हते अशावेळी त्यांना पुढील उपचारासाठी अन्य ठिकाणी हलविण्यात आले. परंतु तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनीत्यांना मृत घोषित केले. माथेरान हे प्रदूषण मुक्त पर्यटनस्थळ असल्याने इथे मोटार वाहनांना बंदी आहे. केवळ स्थानिकांच्या मागणीनुसार इथे रुग्णांना तसेच वेळप्रसंगी पर्यटकांना अत्यावश्यक सेवा उपलब्ध असावी यासाठी रुग्णवाहिका कार्यान्वित करण्यात आली आहे.

> नकीम याच्या मृत्यूस येथील वाह-तूक व्यवस्था तितकीच जवाबदार आहे रुग्णवाहिकेच्या भरोवश्यावर कितिदिवस काढायचे ई रिक्षा सारखी वाहतूक व्यवस्था निर्माण झाली पाहिजे पर्यावरणापेक्षा माणसा-चा जीव अमूल्य आहे. नकीमला तात्काळ वाहन मिळाले असते तर हॉस्पिटल पर्यंत वेळेत पोहचू शकला असता.
>
> **सुनील शिंदे, सचिव श्रमिक हातरीक्षा संघटना माथेरान**

सदर रुग्णवाहिका काही नगरसेवकांच्या घरची गाडी असल्याप्रमाणे तिचा सर्रासपणे नेहमीच भाडे सुध्दा न देता दुरुपयोग केला जात असतो. यावर कुणाचाही अंकुश नसल्यामुळे गैरवापर केला जात असून यात मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल सुध्दा होत असते हे नागरिकांना सुध्दा ज्ञात आहे. अनेकदा अत्यावश्यक वेळेस ही रुग्णवाहिका उपलब्ध होत नसते तर १०८ ह्या रुग्णवाहिकेत सुध्दा वारंवार तांत्रिक बिघाड असल्याचे सांगितले जाते. मागील काही वर्षांपासून या रुग्णवाहिकेचा वडाप सारखाच वापर सुरू असून चोवीस तास प्रतिष्ठित लोकांच्या सेवेत विना मोबदला असते. एक नव्हे तर एकूण तीन रुग्णवाहिका इथे उपलब्ध आहेत परंतु वेळेवर एकही उपलब्ध होऊ शकली नाही त्यामुळे एका सर्वसामान्य फोटोग्राफरला आपले प्राण गमवावे लागले आहेत. अनेक दानशूर लोकांनी या दुर्गम भागातील दवाखान्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री असलेली उपकरणे देणगी दाखल दिलेली आहेत त्याचा उपयोग अथवा ही मशिनरी हाताळण्यासाठी कर्मचार्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही नगरपरिषदेचा एवढा सैल कारभार पाहून नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

> माथेरानकर नकीमच्या अकाली जाण्याने हळहळ व्यक्त करीत आहे.हदयविकाराच्या वेळी ज्या गोल्डन अवर चे उपचार रूग्णाला लागतात ते बी जे हॉस्पिटल मधील डॉ रॉय यांच्या गैरहजेरीत मिळू शकले नाही ही बाब निश्चितच निषेधार्थ आहे. डॉ रॉय यांना माथेरानला सेवा देणे अवघड असेल तर तसा अहवाल स्थानिक प्रशासनाने जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करावा.
>
> **योगेश जाधव, अध्यक्ष वन संरक्षण समिती माथेरान**

# जिल्ह्यात दि.२५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सूचनेनुसार रायगड जिल्ह्यामध्ये दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्री.संदीप वि. स्वामी यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, दिव–आणी प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्ट, खालील प्रकरणे, दिवाणी अपिले, तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे व अपिले ठेवली जाणार आहेत. तसेच नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास संपूर्ण कोर्ट फिस परत मिळते तसेच प्रलंबित व वादपूर्व प्रकरणातील निकालाविरुध्द अपिल होत नाही. त्यामुळे पक्षकारांचा बराच वेळ व खर्च वाचतो, पक्षकारांना जलद व तात्काळ न्याय मिळतो.

त्यामुळे दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्रीमती विभा प्र. इंगळे यांनी केले आहे.

# अमरधाम येथील विजेचे खांब भूमिगत करा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी अमरधाम येथे रस्त्याची पाहणी केली. दोन दिवसांपूर्वी रात्री विजेच्या खांबाला एक कार धडकली. या धडकेत कारचे नुकसान झाले.



या घटनेवरून रस्त्याच्या मधोमध असणारे विजेचे खांब अपघातांना आमंत्रण देत असल्याचे समोर आले. त्याची माहिती विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांना समजतात त्यांनी महावितरणचे कर्मचारी, अधिकारी तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांना सोबत घेऊन येथील रस्त्यांची पाहणी केली. यावेळी धोकादायक ठरत असलेल्या विजेचे खांब भूमिगत करण्यासाठी सांगितले तसेच येथील ड्रेनेजची कामे, स्ट्रीट लाईटची अर्धवट आहेत ती कामे देखील पूर्ण करण्यासाठी विरोधी पक्ष नेते .../२

# मुंबईत कुणबी विद्यार्थी वसतीगृहासाठी ५ कोटीचा धनादेश प्रदान



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्याला आजवर लाभलेल्या प्रत्येक नेतृत्वाने प्रयत्न केले आहेत. ही परंपरा महाराष्ट्रात यापुढेही अबाधित राहील, जपली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

सह्याद्री अतिथीगृह येथे कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई यांच्या मुलुंड येथील कुणबी विद्यार्थी वसतीगृहाच्या .../२



**रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रविंद्र चव्हाण यांचे वाढदिवस निमित्ताने भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर तसेच पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक बबन मुकादम यांनी अभिष्टचिंतन केले.**

# ग्रुप ग्रामपंचायत पारगावने राबविलेल्या मोफत लसीकरण मोहिमेचे होत आहे कौतुक




**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पारगावने राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार राबविलेल्या मोफत लसीकरण मोहिमेचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून आज त्यांनी १५० जणांचे मोफत लसीकरण केले आहे.

कोव्हीशिल्ड लसीचा पहिला व दुसरा डोस वय वर्षे १८ व ४५ वरील व्यक्तींना आज देण्यात आला. सोशल डिस्टन्सिंगचे काटेकोरपणे पालन करीत व आधारकार्डद्वारेच हे लसीकरण करण्यात आले. यासाठी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांनी शासनाकडे व आरोग्य विभागाकडे विशेष प्रयत्न करून १५० डोस उपलब्ध करून घेतले. यासाठी त्यांना वैद्यकीय अधिकारी गव्हाण-कोपरच्या डॉ. अस्मिता पाटील तसेच उपसरपंच अंजली कांबळे, मा.उपसरपंच मनोज दळवी, मा.उपसरपंच सुशिल तारेकर, सदस्य विश्वनाथ पाटील, सदस्या निशा पाटील, बाळूबाई म्हात्रे, सुनंदा नाईक, शिल्पा नाईक, कल्पना तारेकर, सोनाली भोईर तसेच डॉ.भारती, मा.उपसरपंच रत्नदीप पाटील, कर्मचारी प्रमोद म्हात्रे, सोनाली देशमुख, चंद्रभागा तारेकर-देवळे आदींनी विशेष मेहनत, सहभाग घेवून हा उपक्रम यशस्वी केला. या उपक्रमाचे पनवेल तालुक्यातून कौतुक करण्यात येत आहे.

# विहूर, चिकणी पूलाची डागडुजी तात्काळ करा

## साळाव-मुरुड रस्त्याच्या दुरावस्थेबाबत भा.ज.पा.तर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे साळाव-मुरुड रस्त्याची पार दुरावस्था झालेली असून या रस्त्यावरील विहूर व चिकणी पूलाची तातडीने डागडुजी करण्याबाबत भारतीय जनता पक्षाच्या वतीने तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंता यांना एक निवेदन सादर केले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, अतिवृष्टीमुळे मुरुड तालुक्यातील विहूर व चिकणी पूल एका बाजूने तुटले असून दुरावस्था झालेली आहे.

पावसामुळे सदरचा रस्ता खचला असून पूलावरुन एकेरी वाहतूक सुरू आहे तसेच मुरुड - साळाव रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत,साईड पट्ट्या तुटल्या आहेत.यामुळे वाहनचालक व प्रवासी वर्गाला त्रास व हाल सहन करावा लागत असून मणक्याचे विकार होऊन आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुरुड-साळाव रस्त्याची दुरुस्ती व चिकणी-विहूर पूलाची तात्काळ डागडुजी करण्यात यावी.या बाबत तात्काळ कार्यवाही न झाल्यास नाईलाजाने भारतीय जनता पक्षातर्फे दि.५ ऑक्टोबर २०२१ रोजी रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल व त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. असे भा.ज.पा.तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, मुरुड तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे मुरुड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष विनोद भगत, सरचिटणीस नरेश वारगे, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, शहर अध्यक्ष उमेश माळी, ज्ञानेश्वर डोलकर,नंदू मयेकर, जयेंद्र भणगे, महेश मानकर, अभिजित पानवलकर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


### शुद्धीपत्र

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.GAN ICOGD-29 प्रमाणे मौजे : पुष्पक नोड येथे सेक्टर क्र.२४, भूखंड क्र.४५५, क्षेत्र ७०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंडाच्या हस्तांतरणाबाबत दि.०८/०९/२०२१ रोजी ''दैनिक रायगड नगरी'' या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर नोटीसीमध्ये ता.पनवेल ऐवजी ता.उरण असे नजर चुकीने प्रसिद्ध झालेले आहे. त्याअर्थी ता.उरण नसून ता.पनवेल समजण्यात यावे.

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अर्पा.उरण,**
**ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**
Email : mariya.koli@yahoo.com



मा.सौ.गोडसे मॅडम कोर्ट

ॲड.राजेश बांगर, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११५०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/१०/२०२१

१) श्रीमती.अंजना बाळाराम भोईर
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.५१०, लक्ष्मी नारायण मंदिराजवळ,
कोल्ही कोपर, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.अपर्णा अरविंद भोईर
वय : २९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३) कुमारी.किंजल अरविंद भोईर
वय : ०९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
४) कुमारी.काव्या अरविंद भोईर
वय : ०५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
क्रं.२ स्वतःकरिता व क्रं.३ ते ४ ची
अज्ञान पालन करणार आई म्हणून
क्रं.२ ते ४ रा.४३७, बी लक्ष्मी नारायण मंदिर
कोल्ही पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड ...अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचा मुलगा व अर्जदार क्रं.२ यांचे पती व अर्जदार क्रं.३ ते ४ यांचे वडील कै.अरविंद बाळाराम भोईर यांचे निधन स्पर्श सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल पनवेल येथे दि.०१/०६/२०२१ रोजी झाले आहे. श्रीमती.अंजना बाळाराम भोईर वगैरे ह्यांनी कै.अरविंद बाळाराम भोईर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै.अरविंद बाळाराम भोईर यांच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर (पुष्पक नगर), ता.पनवेल, जि.रायगड**
**येथील सेक्टर आर ३ मधील भूखंड क्रं.१४८,**
**क्षेत्र ४६० चौ.मी. अशा वर्णनाची भूखंडाची मिळकत**

सदरील परिच्छेद २ कडील मिळकतीमध्ये कै.अरविंद बाळाराम भोईर यांचा हिस्सा आहे.

वर श्रीमती.अंजना बाळाराम भोईर वगैरे ह्या कै.अरविंद बाळाराम भोईर यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.अंजना बाळाराम भोईर वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.अरविंद बाळाराम भोईर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# वालवटी रस्त्याची दुरवस्था

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मुरुड तालुक्यातील वालवटी रस्त्याची पार दुरावस्था झालेली असून रस्त्याच्या कामाची चौकशी होऊन कारवाईची मागणी वेळास्ते ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप गोणबरे यांनी केली आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत काही महिन्यांपूर्वी या रस्त्याचे काम करण्यात आले होते.मात्र पावसाळ्याच्या सुरुवातीलाच तसेच झालेल्या अतिवृष्टीमुळे अक्षरशः रस्ता काही ठिकाणी फुटून पार दुरा-वस्था झाली आहे.रस्त्याच्या दुरावस्थेमुळे वाहनचालक व प्रवासीवर्गाला त्रास सहन करावा लागत असून वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष पुरवून रस्ता दुरुस्ती अशी मागणी होत आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : अकुळवाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचा ७/१२ उतारी सदरी १) श्री.श्रीदत्त गणेश जोशी, २) श्री.श्रीकांत गणेश जोशी, ३) श्री.आनंद गणेश जोशी यांची नावे नमूद असून सदरची मिळकत त्यांच्या मालकी हक्काची वहिवाटीची व ताबेकब्जाची असल्यामुळे सदरहू मिळकत ही आमचे अशिलांनी विकत घेण्याची ठरविलेली आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता आमचे अशिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

तुकडी पनवेल, पोट तुकडी ता.पनवेल, मे.सब रजिस्टार साहेब, पनवेल यांचे हद्दीतील ग्रुप ग्रामपंचायत व जिल्हा परिषद रायगड, ४१०२०६, तालुका पंचायत समिती, अकुळवाडी, ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे हद्दीतील मौजे : अकुळवाडी येथील मिळकत.

| मौजे | सर्व्हे नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| अकुळवाडी | १३१/१ | ००-४८-८० पो.ख. ००-०८-१० | ८.३७ |
| अकुळवाडी | १३१/२ | ००-१५-०० पो.ख. ००-०३-०० | ०.६६ |
| अकुळवाडी | १२२ | ००-०९-१० पो.ख. ००-०१-५० | ०.७८ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टांमध्ये नमूद केलेल्या सदर मिळकतीमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी बोजाविरहित असून, त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही, असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत, असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२१/०९/२०२१

**सही/-**
**सागर एस. जगे**
**वकील**
**गाळा नं.८, श्री लक्ष्मी को.ऑप.हौ.**
**सोसायटी, टिळक रोड, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९००४०८८३५३**



## ग्रामपंचायत कानपोली

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.२०/०९/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कानपोली हद्दीतील १५ व्या वित्त आयोगांतर्गत खालील विकासकामे व साहित्य खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.२१/०९/२०२१ ते २७/०९/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२८/०९/२०२१ रोजी दुपारी ११ वाजता निविदा उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कानपोली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

### १५ वा वित्त आयोग जाहीर सूचना निविदा २०२०/२१

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | राजिप शाळा कानपोली /हेदुटणे येथे हॅण्डवॉश स्टेशन उभारणे | ५०००० | ५०० |
| २ | राजिप शाळा कानपोली/हेदुटणे येथे पाणी टाकी बसून शुद्ध पाण्याची व्यवस्था करणे | ५०००० | |
| ३ | राजिप शाळा कानपोली/हेदुटणे यांना आरोग्य विषयक साहित्य पुरविणे | ३४१८३ | |
| ४ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडींना वॉटर फिल्टर बसविणे | ५३६७३ | |
| ५ | हेदुटणे पिंपळवाडी येथे साठवण टाकी बांधणे व पाणी लाईन टाकून वैयक्तीक नळ कनेक्शन देणे | २४०८९८ | २४०८ |
| ६ | ओला व सुका कचरा वर्गीकरण करण्यासाठी कचरा कुंडी खरेदी करणे | १०७९७८ | |
| ७ | फॉडींग मशिन खरेदी करणे | ३५१८३ | |
| ८ | घरगुती वापरण्यासाठी छोटी कचरा पेटी खरेदी करणे | ९९००० | |
| ९ | अंगणवाडीत वजन काटा खरेदी करणे व भांडी खरेदी करणे | ५३६७३ | |
| १० | राम चांगा गिरा ते राजिप शाळा हेदुटणे पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | १५०००० | १५०० |
| ११ | मागासवर्गीय वस्तीत दिवाबत्ती / हायमास्ट बसविणे | ९०९९९ | |
| १२ | ग्रामपंचायत हद्दीतील पोलवर एलईडी लाईट बसविणे | ५४३०४ | |

### १५ वा वित्त आयोग जाहीर सूचना निविदा २०२१/२२

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | केशव दत्तू खानावकर ते राजिप शाळा कानपोली गटार बांधणे | २४२०९० | २४२० |
| २ | कानपोली गावांतर्गत बंद गटारे बांधणे व दुरुस्ती करणे | १५०००० | १५०० |
| ३ | ग्रामपंचायतीमध्ये साथरोग नियंत्रण उपाय योजना राबविणे | ६०००० | |
| ४ | ग्रामपंचायत हद्दीतील कुटुंबांना ओला व सुका कचरा टाकणेसाठी कचरा कुंड्या खरेदी करणे | ८२०९० | |
| ५ | राजिप शाळा कानपोली किरकोळ दुरुस्ती करणे व रंगरंगोटी करणे | १२१०४५ | १२१० |
| ६ | संदर्भसेवेसाठी व अंगणवाडी लाईट बिलासाठी व नेट बिल भरणा करणेसाठी अंगणवाडीकडे रक्कम वर्ग करणे | १०००० | |
| ७ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडी कमी वजनाच्या मुलांना पोषण आहार व भांडी, साहित्य खरेदी करणे | ३८४१८ | |
| ८ | हेदुटणे आदिवासीवाडी स्मशानभूमीकडे जाणाऱ्या नाल्यावर लोखंडी पुल टाकणे | ११८३१२ | ११८३ |
| ९ | हेदुटणे आदिवासीवाडी येथे दिवाबत्ती सोय करणे | ९९०० | |
| १० | कचरा कुंडी खरेदी करणे | ४८९८७ | |

**अटी व शर्ती :-**

१.भरलेल्या सीलबंद निविद/कोटेशन दिनांक २१/०९/२०२१ ते २७/०९/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२.आलेल्या निविदा दि. २८/०९/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील .

३.मंजूर दुकानदारास वस्तू दिल्याशिवाय पैसे दिले जाणार नाहीत.

४.निविदा/कोटेशन पोष्टाने दिनांक २७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालयामध्य पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा /कोटेशन स्वीकारल्या जाणार नाहीत.

५.सदर जाहिरातीमधील अनुक्रमांक १ ते १२ व १ ते १० नुसार मागविण्यात आलेल्या साहित्याचे, दुरुस्तीचे, उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.

६.नियमा प्रमाणे सर्व शासकीय भरणा करावा लागेल.

७.अधिकृत ठेकेदारांनी/दुकानदारांनी निविदा/कोटेशन न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.

८.कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, बिलातून कपात केली जाईल.

९.वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून/दुकानदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.

१०. निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील .

११.निविदा/कोटेशन मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.

१२.निविदा/कोटेशन मंजूर केल्यावर रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.

१३.सुरक्षा अनामत रक्कम ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा/वस्तूचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१४.निविदा/कोटेशन धारका कडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

१५.अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्वीकृत राहील.

१६.निविदा मंजूर केलेल्या प्रमाणे काम करण्यात यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.

१७.कमीत कमी दराची निविदा/कोटेशन मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

१८.निविदा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सही/-** **ग्रामसेवक** **ग्रामपंचायत कानपोली**

**सही/-** **सरपंच** **ग्रामपंचायत कानपोली**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## पुढील महिन्यापासून भारत पुन्हा संपूर्ण जगाला कोरोनाविरोधातील लसी पुरवणार

विषाणूविरोधातील सुरू असलेल्या लसीकरणाच्या अभियानांतर्गत आतापर्यंत ८१ कोटींहून अधिक व्यक्तींना लसीचे डोस देण्यात आले आहे. त्यांनी सांगितले दरम्यान, १० कोटी डोस तर केवळ ११ दिवसांत दिले गेले, अशी माहितीही त्यांनी दिली.

केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांनी पुढे सांगितले की, व्हॅक्सिन मैत्रीतर्गत भारत संपूर्ण जगाला मदत करणार आहे. तसेच चौथ्या तिमाहीमध्ये कोव्हॅक्समध्ये योगदान देणार आहे. आम्हाला पुढच्या महिन्यात कोरोनाविरोधी लसीचे ३० कोटींहून अधिक डोस मिळण्याची अपेक्षा आहे. लसींचे उत्पादन वाढणार आहे. याचं कारण म्हणजे जैविक ई आणि इतर कंपन्या आपल्या लसी बाजारात आणणार आहेत. कोव्हॅक्स एक जागतिक पाऊल आहे, त्याला औपचारिकपणे कोविड-१९ लसीची जागतिक पुरवठा सुविधा म्हणून ओळखले जाते. मध्यम आणि अल्प उत्पन्न असलेल्या देशांना कोरोनावरील लसीचे डोस वेळेत मिळावे, हे सुनिश्चित करणे हे याचे लक्ष्य आहे.

यादरम्यान, केंद्रीय आरोग्यमंत्रालयाने सांगितले की, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना कोविड-१९ लसींचे आतापर्यंत ७९.५८ कोटींहून अधिक डोस उपलब्ध करण्यात आले आहेत. मंत्रालयाने सांगितले की, १५ अजून डोसचा पुरवठा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांजवळ वापर करण्यासाठी लसीचे ५.४३ कोटी डोस उरलेले आहे.

राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना लसींची उपलब्धता वाढवून लसीकरण अभियानाला गती देण्यात आली आहे. जेणेकरून त्याद्वारे चांगली योजना बनवता येईल. तसेच लसींच्या पुरवठ्याची साखळ सुव्यवस्थित करता येईल. राष्ट्रव्यापी लसीकरण अभियानांतर्गत केंद्र, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना कोविड-१९ विरोधी लसी निशुल्कपणे उपलब्ध करून दिले जातील.

## अमरधाम येथील विजेचे खांब भूमिगत करा : प्रितम म्हात्रे

प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले आहे. विकास कामांमध्ये विजेचे पोलचे अडथळे येतात त्याचे टेंडर निघाले आहेत. वर्क ऑर्डर निघणार आहेत ते झाल्यावर येथील पोल काढणार असल्याची माहिती पालिकेचे विद्युत विभाग प्रमुख प्रीतम पाटिल यानी सांगितले.

## मुंबईत कुणबी विद्यार्थी वसतीगृहासाठी ५ कोटीचा धनादेश प्रदान

इमारतीसाठी ५ कोटी रुपयांच्या धनादेश वाटपाचा कार्यक्रम झाला.

उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार म्हणाले, कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, याची काळजी शासन कटाक्षाने घेते. या वसतीगृह इमारती बांधणी प्रक्रियेत सौर ऊर्जेचा वापर व्हावा, अनावश्यक खर्च टाळावे, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त पर्यावरणपूरक इमारत बांधण्यात यावी. इमारत बांधणीसाठी काही अडचणी आल्यास त्या दूर करण्याचा नक्कीच प्रयत्न केला जाईल, असे श्री. पवार यांनी सांगितले.

खासदार श्री.सुनील तटकरे म्हणाले, कुणबी समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधणीसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार धनादेश वाटपाचा कार्यक्रम होत आहे. कुणबी समाजासाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. या वसतीगृहात राहून समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थी विविध क्षेत्रात नक्कीच प्राविण्य मिळवतील असा विश्वासही खासदार श्री. तटकरे यांनी व्यक्त केला.

कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने वास्तव्यास असलेल्या कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांना नोकरीत प्रवेशासाठी मुलाखत, स्पर्धा परीक्षेची तयारी, वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात वाटचाल करण्यासाठी हे वसतीगृह उपयुक्त ठरेल, अशा विद्यार्थी वसतीगृहाची स्थापना कुणबी समाजोन्नती संघ व राज्य शासनाच्या मदत निधीतून होत आहे. याबाबत संघाच्या पदाधिकारी यांनी आभार व्यक्त केले. यावेळी श्री.बाबाजी जाधव, कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष भूषण बरे, संदिप रायपूरे व संघाचे पदाधिकारी व सभासद कार्यक्रमास उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पालीसह सुधागड तालुक्यात दहा दिवसांच्या बाप्पाला भक्तिमय वातावरणात भावपुर्ण निरोप

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी घेत रविवारी (ता.१९) पालीसह सुधागड तालुक्यात भक्तिमय वातावरण दहा दिवसांच्या बाप्पाला भावपुर्ण निरोप देण्यात आला. यावेळी भाविकांनी शाश्रु नयनांनी बाप्पाला पुढल्या वर्षी लवकर या चा गजर केला.

गणेशोत्सवादरम्यान कुठेही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांचा सर्वत्र चोख बंदोबस्त होता. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती बोराडे, इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात होते.

सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी गणेश विसर्जनाच्या मार्गदर्शक सूचना व नियमावली नागरिकांना सांगून त्याचे पालन करण्याचे आवाहन केले होते. येथिल आंबा नदी घाटावर तसेच काही तलावांवर गणरायाचे विसर्जन करण्यात आले. कोरोनाची खबरदारी घेत अनेकांनी दुचाकी व मोटर मधून गणरायाची मूर्ती विसर्जनासाठी आणली. काही ठिकाणी ढोलताशांच्या व पारंपारीक वाद्याच्या गजरात, गुलालाची उधळण करण्यात आली. यावेळी विसर्जनस्थळी भक्तांची गर्दी दिसली.



## म्हसळ्यात अनंत चतुर्दशीच्या गणेश्यांना भावपूर्ण निरोप

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात आज अनंत चतुर्दशी च्या गणप-तीचे वाजत गाजत उत्साहात विर्सजन करण्यात आले. शहरातील एकूण ३५ ते ४० गणपतींचे विसर्जन वाजत-गाजत, फटाकांच्या आतषबाजीत, गणपती बाप्पा मोरया च्या गर्जनेत विर्सजन करण्यात आले. आज विर्सजन होणारे सर्वच गणपती खाजगी असल्याने मा. जिल्हा धिकारी व मा.जिल्हा पोलीस अधिक्षक रायगड यांचे नियम व निर्देशा प्रमाणे बहुतांश भाविकानी नियमांचे पालन करीत विसर्जन उत्साहात केले. तालुक्यात बहुतांश गावातून खाडी,नदी,तळी,मोठे ओहोळाचे पात्रात, ग्रामपंचायतीने बांधलेले विसर्जन घाटावर व विहीरीतून श्रीचे व गौरींचे विसर्जन करण्यात आले. म्हसळा पोलीस स्टेशनचे सपोनी उध्दव सुर्वे यानी २ आधि- कारी व २५ कर्मचाऱ्यांचा विसर्जन सोहळयाचे कार्यक्रमासाठी बंदोबस्त होता.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.नागराज सन्ना गौडा यांचे मौजे : डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील ग्रामपंचायत उसर्ली खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील ''श्रीराम रेसिडेंनसी को.ऑप.हौ.सोसायटी'' मधील तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र.एफ-३०१ या सदनिकेचे / मिळकतीचे मा.दुय्यम निबंधक साहेब पनवेल यांचेकडे दि.२६/०६/२०१५ रोजी दस्त क्र.पवल ४-७८६२/२०१५ कडे नोंदणीकृत केलेले सेल डीडचा मुळ दस्त आमच्या अशिलांकडून गहाळ झालेला आहे.

सदर वर नमूद मुळ दस्त हरवलेला असल्याने, सदर दस्त घेवून त्या कागदपत्रांचे आधारे मौजे : डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील ग्रामपंचायत उसर्लीखुर्द ग्रामपंचायत हद्दीमधील ''श्रीराम रेसिडेंसी को.ऑप. हौ.सोसायटी'' मधील तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र.एफ-३०१ या सदनिकेचा / मिळकतीचा बेकायदेशीररित्या गैरवापर करून खरेदी-विक्रीचा व्यवहार करण्याची दाट शक्यता आहे.

तरी वर नमूद केलेल्या मिळकतीचे गहाळ झालेल्या दस्तऐवजाची मुळ प्रत कोणत्याही व्यक्तीस सापडल्यास त्यांनी सदर दस्तऐवजाची मुळप्रत खाली नमूद केलेल्या पत्यावर आणून द्यावी. तसेच जर कोणी व्यक्तीने / त्रयस्थ इसमांने सदर दस्तऐवजाची मुळप्रतीचा गैरवापर करताना आढळल्यास खाली नमूद पत्यावर त्वरित संपर्क साधावा. तसेच सदरचा इसम दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

दि.२१/०९/२०२१
पनवेल

**सही/-**
**ॲड.प्रगती डी. ठाकूर**
**नगरपरिषद कॉम्प्लेक्स, ऑफिस क्र.२२,**
**तहसील कार्यालयाजवळ, पनवेल रायगड**
**मो.नं.९१७२५६११११**



मे.मुजावर साहेब
वकील : ज्योती अमित कोकाटे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
चौकशी अर्ज नं.३०/२०२१
नि.नं.१५
ने.ता.२५/१०/२०२१

मर्सलीन फ्रान्सिस डिसुजा — अर्जदार

अर्जदार रा.सी./५/३३/२-२, पंचरत्न अपार्टमेंट, सेक्टर ५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

वरील अर्जदार यांचे वडील यांचा मृत्यू दि.०८/०१/२०१६ रोजी हिरानंदानी हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे झाला. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट क्र.७०१, ७ वा मजला, ॲरिस्टो क्लासिक बिल्डींग, फ्लॅटचे क्षेत्रफळ ३३.५५ चौ.मी. (कारपेट एरिया), प्लॉट क्र.१८, (सिडकोच्या साडेबारा योजनेंतर्गत मधील) क्षेत्रफळ ५४९.६५ चौ.मी., सेक्टर ३०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

**मिळकतीचे मुल्यांकन : २२,००,०००/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावे.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/९/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# गणेशोत्सवात माथेरानकरांना लाभली सत्संगाची साथ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात कुणालाही अध्यात्मिक अथवा सांस्कृतिक कार्य करण्यास मुभा मिळत नसते. त्यातच पर्यटनावर अभिप्रेत असणाऱ्या इथल्या सर्वसामान्य लोकांना आपल्या रोजगारात कशाप्रकारे अधिकाधिक भर पडेल याकडे सर्वांचे लक्ष असते. त्यामुळे सहसा तरी कुणालाही अध्यात्मिक ज्ञानाचा उलगडा आणि आकलन होत नाही. संसारासह पारमार्थिक उद्देश सुध्दा जोडीला असल्यास जीवन सार्थकी होत असते परंतु इथे श्री सदस्यांच्या बैठकीच्या माध्यमातून ज्याप्रकारे श्री सदस्यांना जीवनातील वागणूक कशाप्रकारे असावी आणि आपला जन्म कशासाठी आणि काय प्राप्ती साठी झाला आहे आपली काय जबाबदारी आणि कर्तव्ये आहेत याबाबत अनमोल ज्ञान प्राप्त होत असते. त्याप्रमाणे अन्य कोणत्याही प्रकारचा अध्यात्मिक ज्ञानाचा स्त्रोत इथे उपलब्ध नाही.आणि कुणीही सहसा असे सत्संगाचे उपक्रम राबविले जात नाहीत. कोरोना काळात तर अनेकांना वेगवेगळ्या अडचणींना सामोरे जावे लागले होते.वर्षातून ठराविक सणांना यामध्ये गोकुळ अष्टमी, दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र, दसरा, दिवाळीच्या सणात इथली मंडळी एकत्रित येऊन सण साजरा करतात आपल्या विचारांची देवाणघेवाण आणि एकोप्याचे दर्शन घडवीत असतात. गणेशोत्सवात सर्वांच्या घरोघरी जाऊन बाप्पाचे दर्शन घेऊन समाधान व्यक्त करीत असतात अशावेळी सर्व अंतर्गत मतभेद, जात धर्म बाजूला ठेवून गुण्यागोविंदाने नांदत असतात.



माथेरानचे भूमिपुत्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सत्संग प्रमुख विश्व हिंदू परिषद दादा वेदक हे दरवर्षी न चुकता आवर्जून माथेरान मध्ये आपली उपस्थिती लावून एक दिवस मुक्कामी राहून स्व. रामचंद्र शिंदे यांच्या घरी सत्संगाचा प्रसार आणि ज्ञानाचे अदभूत मार्गदर्शन करीत आहेत.यंदाही त्यांनी उत्तम प्रकारे सत्संगाच्या माध्यमातून आपले अनमोल विचार प्रकट करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सोशल डिस्टनिंग ठेऊन अनेकांनी याचा लाभ घेतला. यावेळी विश्व निर्माण परिषदेचे माथेरान अध्यक्ष हरीभाई मेहता, हॉटेल गुजरात भवनचे मालक उमेशभाई दुबल, मुकेश तोरणे, स्व.रामचंद्र शिंदे यांच्या स्नुषा सुहासिनी शिंदे, श्रमिक हात रिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे, नगरपालिका उपाध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, प्रदीप घावरे, माथेरान नागरी सहकारी पतसंस्था सभापती हेमंत पवार, वसंत कदम, मिथुन कदम, मुकुंद रांजाणे, चैतन्य शिंदे आदी उपस्थित होते.

## दैवज्ञ (सोनार) समाज तळा वतीने गुणवंत शिक्षिका व विद्यार्थी गुणगौरव सोहळा साजरा

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

तळा : गणेशोत्सव २०२१ चे औचित्य साधून दैवज्ञ (सोनार) समाज वतीने कोकण म.सा.प.गुणवंत शिक्षीका पुरस्कार कर्ती मितल सुहास वावेकर यांचा व समाजातील गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनीचा समाज अध्यक्ष डॉ.प्रविण पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर सचिव प्रशांत वेदक, माजी अध्यक्ष, सचिव नारायण वेदक, माजी खजिनदार कमळाकर वावेकर, विश्वस्त किशोर वेदक उपस्थित होते. मितल वावेकर यांना पुरस्कार प्राप्त



झाल्या बद्दल व किशोर वेदक नमो नमो मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. श्रीफळ, शाल, भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच आजी माजी पदाधिकारी जेष्ठ समाज बांधव नोकरी व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन प्राप्त बांधवांचा सन्मान करण्यात आला. तसेच महीला मंडळा तर्फे मितल वावेकर, राजश्री वेदक हिचा भेट वस्तू देऊन सत्कार केला. या आनंदायी सोहळ्यात कार्यक्रमाला समाज बंधूभगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निसर्ग गार्डन हॉटेलवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील कोन गावाच्या हद्दीत असलेल्या निसर्ग गार्डन हॉटेलवर पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे.

सदर ठिकाणी ग्राहक लोकांची टेबलावर बसून गर्दी करून खाद्यपदार्थ सेवन करताना त्यांना सर्व्हिस देणाऱ्या वेटरने मास्क न ला-वता व सामाजिक अंतर न पाळल्याचे आढळून आले व कोरोना विषाणू सारख्या संसर्गजन्य रोगाचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता असल्याची जाणीव असताना देखील हयगयीचे व निष्काळजीपणाचे कृत्य केले म्हणून सुखरान गिरी (वय-३४) हॉटेल कॅशर व युवराज शेळके (वय-२६) मॅनेजर यांच्याविरूद्ध कलम-१८८, २६९, भादंवि साथ रोग प्रतिबंध अधिनियम कलम २,३ सह महाराष्ट्र शासन कोव्हिड-१९ २०२०चे कलम ११ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

## पेणमध्ये उत्साही वातावरणात गणपतीचे विसर्जन



**दै.रायगड नगरी । पेण**

मागील वर्षी प्रमाणे यावर्षी देखील धार्मिक सणांना कोरोनाचे नियम लागू असल्याने यावर्षीचा गणेशोत्सव देखील साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. मात्र हा गणेशोत्सव साध्या पध्दतीने जरी साजरा करण्यात आला असला तरी घरामध्ये आलेल्या बाप्पाचे आणि आनंदी वातावरणात जयघोषाने विसर्जन करण्यात आले.

पेण तालुक्यात खाजगी, सार्वजनिक गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करण्यात आले. मात्र दरवर्षी ढोल ताशांच्या गजरात आणि वाजतगाजत मिरवणुकीच्या ठेक्यात बाप्पाला निरोप देण्याच्या प्रथेमध्ये गतवर्षीप्रमाणे यावर्षी देखील खंड पडला असला तरी गणेश भक्तांनी अगदी आनंदी वाता-वरणात आणि टाळ वाजवत, बाप्पाच्या जयघोषात गणरायाला निरोप दिला. दरम्यान पेण पोलीस स्टेशन, दादर सागरी पोलीस स्टेशन, वडखळ पोलीसांनी सर्व विसर्जन घाटांवर चोख बंदोबस्त ठेवला होता. तालुक्यातील वडखळ डोलवी, दादर, जोहे, कळवे, गडब, कासु, वाशी, जिते, हमरापूर, बळवली, अंतोरे, वडखळ आदी सर्व गावात गणपतीचे शांततेत विसर्जन करण्यात आले. पेण पालिकेने देखील भुंडा पूल, विश्वेश्वर मंदिर, फणस डोंगरी, शिवाजी नगर, चिंचपाडा, साई मंदिर या ठिकाणी कृत्रिम तलाव उभारले होते. आणि पावसाचे वाढते प्रमाण पाहता नदीच्या विसर्जन ठिकाणी स्वीमर तैनात ठेवले होते.

## पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसिस सेंटरची प्रितम म्हात्रे यांनी केली पाहणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसीस सेंटरची पाहणी केली.

यावेळी येथील अडचणी त्यांनी जाणून घेतल्या व डायलेसिस सेंटर साठी ला-गणारे तज्ज्ञांसंदर्भात पालकमंत्री यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. यासाठी पालकमंत्री आदिति तटकरे यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयातील कक्ष सेवक यांच्याबाबत पालिका आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली व चर्चा करून पालिकेने त्यांना सामावून घेतले पाहिजे अशी मागणी केली. त्यावेळी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. लवकरात लवकर अतिरिक्त कक्षा सेवकांची पदभरती करण्यासाठी प्रस्ताव करावा अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्याकडून करण्यात आलेली आहे.




श्री.भाकरे सा़े.कोर्ट
अर्जदाराचे वकील : ॲड.मदन गोवारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२०८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/११/२०२१

१) श्री.स्टॅनी थॉमस
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.सॅम थॉमस
वय : २३ वर्षे, व्यव : नोकरी
दोघेही रा.फ्लॅट नं.२०३, कोणार्क रिवर सिटी,
बिल्डींग नं.०४, माथेरान रोड, कोप्रोली,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांच्या आई कै.कॅप्टन शीना थॉमस या दि.१४/०२/२०२१ रोजी मु.फ्लॅट नं.२०३, कोणार्क रिवर सिटी, बिल्डींग नं.४, माथेरान रोड, कोप्रोली, नवीन पनवेल येथे मयत झाल्या आहेत. कै.कॅप्टन शीना थॉमस यांच्या नावे असलेले फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे...

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कोप्रोली ग्रामपंचायत हद्दीतील, ता.पनवेल, जि.रायगड येथील फ्लॅट मिळकत गट नं.२७/ब, २७/२ सी, २७/४ वरील ''कोणार्क रिवर सिटी'' बिल्डींग नं.०४ मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं.२०३, क्षेत्र ६१.४१ चौ.मीटर कारपेट एरिया बाल्कनी सहीत आणि पार्कींग नं.२४४**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.कॅप्टन शीना थॉमस यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाहीत असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.राव सा़े.यांचे कोर्टात
ॲड.भूषण म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२४८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/१०/२०२१

पै.अब्दुलरजाक कादरबादशहा शेख, मयतचे वारस
१) श्रीमती.हबीबुनिसा अब्दुल रजाक शेख
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.निलोफर अब्दुल रजाक शेख
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्रीमती.रुबीनाझ अब्दुल रजाक शेख
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
४) श्री.मोमीनखान अब्दुल रजाक शेख
वय : २९ वर्षे, धंदा : काही नाही
५) श्री.आलमखान अब्दुल रजाक शेख
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी.२०२, हरि प्रिया अपार्टमेंट,
रोड नं.२०, प्लॉट नं.२०, सेक्टर १२,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, पै.अब्दुल रझाक कादर बादशाह शेख ह्यांचे निधन दि.२३/०१/२०१५ रोजी नवीन पनवेल, ता.पनवेल येथे झालेले असून, त्यांची आई पै.हसनमॉबी कादर बादशाह शेख यांचे निधन सन १९६५ साली नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. श्रीमती.हबीबुनिसा अब्दुल रजाक शेख, वगैरे ह्यांनी पै.अब्दुल रझाक कादर बादशाह शेख यांच्या खालील वर्णनाची स्वकष्टार्जित मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**बी २०२, हरी प्रिया अपार्टमेंट,**
**रोड नं.२०, प्लॉट नं.२०, सेक्टर १२,**
**नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रु.६,९५,८५०/-**
**(अक्षरी रक्कम रुपये सहा लाख पंच्यान्नव हजार आठशे पन्नास मात्र)**

वरील मिळकत ही पै.अब्दुल रझाक कादर बादशाह शेख यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.हबीबुनिसा अब्दुल रजाक शेख, वगैरे हे पै.अब्दुल रझाक कादर बादशाह शेख यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.हबीबुनिसा अब्दुल रजाक शेख, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै.अब्दुल रझाक कादर बादशाह शेख यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.बारकू रामदास फडके रा.फ्लॅट नं.२०१, ब्लू क्रेस्ट बिल्डींग, प्लॉट नं.९३, सेक्टर ६, करंजाडे ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत आहेत. आमचे अशिलांनी सी.टी.एस.नं.११७/२ पनवेल, येथील शिवसृष्टी अपार्टमेंट या मिळकतीमधील फ्लॅट नं.०३, तळमजला, क्षेत्र ५०.७४ चौ.मी. कारपेट + १९३ चौ.फू. स्टील्ट एरिया + ७७ चौ.फू.स्टील्ट एरिया तसेच स्टील्ट पार्कींग क्रमांक ६ अशा वर्णनाचा फ्लॅट श्रीमती.कनिका बिधान हलदर व इतर यांचेकडून दि.३०/०८/२०११ रोजी खरेदीखताने विकत घेतला. सबब आमचे अशिल हे सदर मिळकतीचे कायदेशीर मालक झाले. त्यानंतर सदर मिळकतीबाबत श्रीमती.कनिका बिधान हलदर यांनी सदर मिळकतीचे मुळ दस्तऐवज क्रमांक ०३२५६/२००६ हे कागदपत्र आमचे अशिलांचे ताबेकब्जात दिले. परंतु सदर मुळ कागदपत्रे आमचे अशिलांकडून दि.०९/०९/२०२१ रोजी पनवेल परिसरातून गहाळ झाले आहेत. आमचे अशिलांनी त्याबाबत १६६८/२०२१ द्वारे पनवेल शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केलेली आहे. आमचे अशिल याद्वारे तमाम जनतेस आव्हान करतात की, वरील उल्लेख केलेल्या मिळकतीचे मुळ दस्तऐवज कोणालाही सापडल्यास खालील दिलेल्या पत्यावर संपर्क साधावा.

पनवेल
दि.२१/०९/२०२१

**सही/-**
**ॲड.चेतन रामू म्हात्रे**
**फ्लॅट नं.04, मंजूषा अपार्टमेंट, स्टेटस हॉटेलच्या बाजूला, गार्डन हॉटेलचे मागे, ठाणा नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९७०२५५१०४२**



राव साहेब
ॲड.शशिकांत म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२३६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/१०/२०२१

१) श्री.बुधाजी दत्तू तांबडे
वय : ६७ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.गुरुनाथ दत्तू तांबडे
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.मोरेश्वर दत्तू तांबडे
वय : ५० वर्षे, धंदा : शती
४) श्री.सुरेश दत्तू तांबडे
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.प्रकाश दत्तू तांबडे
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड
६) श्री.अंकुश दत्तू तांबडे
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
७) श्री.लहू दत्तू तांबडे
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.मुर्बी गाव, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे वडील कै.दत्तू गोमा तांबडे दि.२१/०९/२०२० रोजी घर नं.३३४, मुर्बी गाव, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै. सिताबाई गोमा तांबडे ह्या मुर्बी गाव, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.दत्तू गोमा तांबडे यांची पत्नी कै. कृष्णाबाई दत्तू तांबडे ह्या दि.३०/०९/२००२ रोजी घर नं.३३४, मुर्बी गाव, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.दत्तू गोमा तांबडे यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | १२९ | ३०३ | ५ क | ०-११-२ |
| | | ३०३ | ५ ब | ०-०६-१ |

सदरच्या मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड हा कै.दत्तू गोमा तांबडे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.दत्तू गोमा तांबडे यांचे वारसदार या नात्याने कै.दत्तू गोमा तांबडे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.दत्तू गोमा तांबडे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## ना.सुभाष देसाई यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उद्योग आणि खनिकर्म आणि मराठी भाषा विभाग मंत्री ना.सुभाष देसाई यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–

मंगळवार दि.२१ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी १.०० वा. मुंबई येथून शासकीय मोटारीने खालापूर जि.रायगडकडे प्रयाण. दुपारी ०३.०० वा खालापूर, जि.रायगड येथे आगमन व स्कील ट्रेनिंग सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : पहल नर्सिंग लाईव्ह, जुना रायगड बाजार, पंचायत समिती कार्यालयाजवळ, खालापूर, सायंकाळी ४.३० वा. खालापूर येथून माणगावकडे प्रयाण. मुक्काम– माणगाव. बुधवार दि. दि.२२ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी २.०० वा. माणगाव येथून मोटारीने मुंबईकडे प्रयाण.

## मजगांव स्थानकावर प्रसाधनगृह बांधण्यात यावेत : नागरिक व प्रवासीवर्गाची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मजगांव येथील बस स्थानकावर प्रसाधनगृह बांधण्यात यावेत.अशी मागणी ग्रामस्थ, वाहनचालक व प्रवासीवर्गातून होत आहे.

गेल्या काही वर्षांपासून अलिबाग– मुरुड रस्त्यावर मजगांव स्थानकावर प्रसाधनगृह नसल्याने नागरिक व प्रवासीवर्गाला त्रास व हाल सहन करावा लागत असून उघड्यावर आसरा घ्यावा लागतो आहे.याकडे संबंधित ग्रामपंचायतीने दुर्लक्ष असल्याबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

मागील दोन वर्षांपूर्वी या ठिकाणी ओएनजीसी च्या सहकार्याने शौचालय बांधण्यात आले मात्र अद्याप या शौचालयाचे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण न झाल्याने आश्र्चर्य व्यक्त केले जात आहे तसेच या ठिकाणी होणारी गैरसोय लक्षात घेऊन लवकरात लवकर प्रसाधनगृह बांधण्यात यावेत. अशी मागणी नागरिक व प्रवासीवर्गातून जोर धरीत आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पोलादपूर तालुक्यातील महाबळेश्वर ते कापडे मार्गावर खैर वाहतूक जप्त

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : महाड वन परिक्षेत्रातील पोलादपूर तालुक्यातील कापडे गावातील महाबळेश्वर पोलादपूर मार्गावर खैर सोलिव लाकुड वाहतूक करताना महाड ढालकाठी येथील पुणे येथून महाबळेश्वर मार्गे पोलादपूर ते पुढे रत्नागिरी खेड जाण्यासाठी निघालेला एक टेम्पो वनविभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईत सोलिव खैर लाकडासह ताब्यात घेतला आहे. शुक्रवारी रात्री काळोखात ही कारवाई करण्यात आली.



पोलादपूर तालुक्यात महाबळेश्वरमार्गे कापडेपर्यंत एका टेम्पोमधून सोलिव खैर लाकडाची वाहतूक केली जाणार असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर वनविभागाच्या फिरते पथकाने पाळत ठेऊन शुक्रवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास वनविभागाच्या पथकाने कारवाई केली. यात टाटा ४०७ टेम्पो (क्रमांक एमएच०४ इएल २२८८) आणि २.९१६घनमीटर आकारमानाचे ३ लाख ४७ हजार ४७ रुपये किंमतीचे २३१ खैर सोलिव नग वाहनासह जप्त करण्यात आले. याप्रकरणी महाड–ढालकाठी येथील टेम्पो चालकमालक गजानन यशवंत दिघे व निलेश गंगाराम साळवी (रा. रेपोली, ता.माणगांव) तसेच सहआरोपी दीपक महाडिक (रा.दापोली, जि.रत्नागिरी) यांच्यावर वन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपवनसंरक्षक रोहा आणि सहाय्यक वनसंरक्षक रोहा यांच्या मार्गदर्शनाखाली फिरते पथक रोहा यांना मिळालेल्या गुप्त बातमीवरून शुक्रवारी सायंकाळी सदर टाटा टेम्पो मौजे कापडे महाबळेश्वर पोलादपूर मार्गावर थांबवून तपासले असता त्यामधे खैर सोलिव लाकडे विनापरवाना आढळून आली. संबंधित वाहनावर वनविभागाच्या फिरते पथकाने कारवाई करत वनक्षेत्रपाल महाड यांचे कार्यालयासमोर वाहन मुद्देमालासह जप्त करून आणले.

ही कारवाई उपवनसंरक्षक रोहा अप्पासाहेब निकत व सहाय्यक वनसंरक्षक रोहा विश्वजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनक्षेत्रपाल फिरते पथक रोहाचे इच्छात कांबळी, वनक्षेत्रपाल महाड राकेश साहू, वनरक्षक फिरते पथक रोहा अजिंक्य कदम, वनरक्षक पोपट कारंडे, वनपाल पोलादपूर श्याम गुजर, वनरक्षक तपासणी नाका नवनाथ मेटकरी, सचिन मेने व वनरक्षक मच्छिंद्र देवरे, दिलीप जंगम या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. यासंदर्भात पुढील तपास सुरू आहे. पोलादपूर तालुक्यातील खैरतोडीसाठी केले जाणारे प्रयत्न या आणि यापूर्वीच्या खैर सोलिव लाकडे जप्त करण्याच्या कारवाईनंतर अद्याप थांबले नसून अनेक जंगलातील खैरतोडीनंतर रातोरात वाहतूक केली जात असल्याने स्थानिक वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी जागृत नागरिकांना या अवैध वाहतुकीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास कळविण्याचे आवाहन केले आहे.

## पनवेल पंचायत समिती येथे जल सुरक्षकांनी घेतली स्वच्छता शपथ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वच्छता ही सेवा अभियानाची जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील व उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता डॉ.ज्ञानदा फणसे यांच्या मार्गदर्शनाखाली गतीने अंमलबजावणी सुरू आहे. त्यानुषंगाने आज पनवेल पंचायत समिती येथील सभागृहात गटविकास अधिकारी श्री.संजय भोये यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यातील जल सुरक्षकांची बैठक व प्रशिक्षण संपन्न झाले.

यावेळी संवाद तज्ञ श्री.सुरेश पाटील यांनी स्वच्छता ही सेवा अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत माहिती दिली. यामध्ये गावात श्रमदान मोहीम राबविणे, घर तिथे शोषखड्डा तयार करणे, सार्वजनिक इमारतींची स्वच्छता व प्लास्टिक संकलन ,भिंती रंगविणे व घोषवाक्य लिहणे, odf plus ठराव घेणे आदी उपक्रमांची चर्चा झाली. यावेळी उपस्थितांना स्वच्छता ही सेवा अभियानाची शपथ दिली .

यावेळी मार्गदर्शन करताना गट विकास अधिकारी श्री.संजय भोये म्हणाले की, पाणी दूषित होणार नाही, यासाठी टीसीएलचा योग्य वापर करा व पाणी नमुने गोळा करून वेळेत प्रयोग शाळेत पाठविले जातील याची दक्षता घ्यावी. पाण्याचे स्त्रोत सुरक्षित असतील त्तर शुद्ध व स्वच्छ पाणी नागरिकांना मिळेल. माहितीची योग्य प्रकारे नोंद ठेवणे गरजेचे आहे. स्वच्छता ही सेवा अभियानामध्ये सर्वांचा लोकसहभाग घेऊन पनवेल तालुक्यात जास्तीत जास्त श्रमदान व शोषखड्डे होतील असे सूक्ष्म नियोजन केले आहे.

जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार श्रीमती आदिती मगर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे पाणी गुणवत्तेचे महत्व सांगितले. अनुजैविक व रासायनिक तपासणी विहित नमुन्यातील व कालावधीत पूर्ण करावी व ग्रामपंचायतीला ग्रीन कार्ड दर्जा कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करावा, असे सांगितले. या बैठकीत पाणी योजना व जलस्त्रोत सुरक्षितपणाबाबत गावनिहाय आढावा घेण्यात आला. यावेळी विस्तार अधिकारी श्रीमती मीनल कनोजे, गट समन्वयक श्री.ओंकार पाटील, समूह समन्वयक मनीषा साळवे व पनवेल तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे जल सुरक्षक उपस्थित होते.

## टर्पेंटाईन ऑईलचे अपहार करून बेकायदा विक्री करणाऱ्या पाच जणांविरूद्ध कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टर्पेंटाईन ऑईलचे कुठून तरी अपहार करून ते तालुक्यातील अजिवली येथे काश्मिर बाँबे कॅरियर याठिकाणी घेऊन येऊन ते कंटेनर टँकमध्ये इलेक्ट्रीक मोटारच्या सहाय्याने प्लॅस्टिक ड्रममध्ये काढून घेऊन त्याची विक्री करणाऱ्या पाच जणांविरूद्ध पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. त्यांच्याकडून जवळपास २,१५,०००,०० रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

तालुक्यातील शेडूंग येथे काश्मिर बाँबे कॅरियरच्या गाळ्यात मोहम्मद मुमताज अलि सय्यद (वय–४७), साहिब अजाब (कुलदीप) सिंग (वय–४३), राजेंद्र सुलखन सिंग (वय–४०), परमजीत सिंग मख्खनसिंग तारा (वय–५१), नामदेव सावंत (वय–५५) हे मिळून सदर ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत कंटेनर ट्रकमध्ये असलेले ५४.९५० टन टर्पेंटाईन ऑईलचे कुठून तरी अपहार करून त्याठिकाणी काढत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वपोनि रविंद्र दौंडकर यांना मिळताच त्यांनी पोलिस उपायुक्त शिवराज पाटील व सहा पोलिस आयुक्त भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक (गुन्हे) अंकुश खेडकर, पोलिस उपनिरीक्षक आकाश पवार, सहा पोलिस निरीक्षक तुकाराम कोरडे, पोलिस शिपाई सुनिल खेरनार आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून ५ जणांना ताब्यात घेतले.

# मिस हेरिटीज इंडियाची मानकरी हर्षा वर माथेरानकरांचा कौतुकाचा वर्षाव

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान सारख्या सूंदर पर्यटनस्थळावरील भूमिपुत्रांनी आजवर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून या गावाचे नाव सातासमुद्रापार नेलेले आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अन हुतात्म्यांच्या पावन भूमीत मुलींनी सुध्दा विविध प्रकारच्या आपल्या अंगीकृत कलागुणांसह उत्तुंग झेप घेत प्रगतीपथावर जात आहेत. दुर्गम भाग म्हणून ओळख असलेल्या या छोट्याशा गावातुन पुढे महाविद्यालयीन शिक्षण सांभाळून आपले भावी करियर घडविण्यासाठी मुली सुद्धा प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसून येतात.



माथेरान मधील माजी नगसेविका वासंती जांभळे यांची नात हर्षा विनोद शिंदे ( जांभळे ) हिने नुकताच भारताचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी मृणाल गायकवाड यांच्या एंटरटेंनमेंट आयोजित कार्यक्रमात मिस हेरिटीज इंडिया स्पर्धा पुण्यातील एका पंचतारांकित हॉटेल मध्ये पार पडली होती या स्पर्धेत माथेरान येथील तसेच सध्या महाबळेश्वर येथे वास्तव्य असलेले कु.हर्षा विनोद शिंदे ही या स्पर्धेची मिस हेरिटीज इंडिया ची मानकरी ठरली होती या स्पर्धेत एकूण देशभरातुन सतरा युवतींनी सहभाग घेतला होता. त्यातून माथेरानच्या या कन्येने आपल्या गावाचे नाव खऱ्या अर्थाने सातासमुद्रापार नेले आहे.

दोन दिवसांपूर्वी आपल्या मूळ गावी माथेरान हर्षा माथेरान मध्ये गणेशोत्सव निमित्ताने दाखल झाल्याचे समजल्या बरोबर स्थानिकांसह अनेक मान्यवरांनी तिच्या घरी जाऊन तिला शुभेच्छा देत भरभरून कौतुक केले.याबाबत हर्षाला तिच्या यशाबद्दल विचारले असता तिने सांगितले की, आपल्या या यशामागे आई वडिलांचे मोलाचे मार्गदर्शन असल्याचे सांगितले तसेच मेहनत हीच यशस्वी जीवनाची गुरू किल्ली असल्याचे हर्षा सांगते. लेखन व निसर्ग, व्यक्ती, वास्तू पेंटींग हा हर्षाचा छंद आहे. सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी जागतिक स्पर्धेच नेतृत्व करणार असल्याचा मानस हर्षाचा आहे.

यावेळी तिला शुभेच्छा देण्यासाठी माथेरान नगरीच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, नगरपालिका गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत, उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, प्रदीप घावरे, वन संरक्षण समितीचे अध्यक्ष योगेश जाधव,सामाजिक कार्यकर्ते वसंत कदम,आणि हर्षाच्या परिवारातील मनोज जांभळे, संगीता जांभळे, तुषार जांभळे यांसह अन्य उपस्थित होते.

## क्रिकेटप्रेमी वसंत चौलकर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुळसुंदे येथील ज्येष्ठ नागरिक वसंत दशरथ चौलकर यांचे आज (सोमवार, दि. २० सप्टेंबर) वयाच्या ७३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी नंदा, मुलगा संतोष, स्वप्निल, संकेत, सुना, नातवंडे, असा परिवार आहे.

वसंत चौलकर यांच्या पार्थिवावर गुळसुंदे येथील स्मशानभूमीत कोरोनाचे नियम पाळून अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि नातेवाईक, ग्रामस्थ उपस्थित होते.


मे.आरती शिंदे सो.

ॲड.सारिका शेगट–लबडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज क्र.९०८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/१०/२०२१

श्री.गोविंद महादेव कोंडीलकर
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी/शेती
रा.मु.कासप, पो.आपटा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत कराडे खुर्द,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांचे आजोबा पदू देहू कोंडीलकर हे दि.२०/०७/१९८७ रोजी मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथे मरण पावले आहे. परंतु मयत पदू देहू कोंडीलकर यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांचे घातील व्यक्तींकडून अज्ञानामुळे / अनावधानाने एक वर्षाच्या आत शासन दप्तरी त्यांचे मृत्यूची नोंद करण्याचे राहून गेले आहे. सबब अर्जदार यांनी सदरील अर्ज मयत पदू देहू कोंडीलकर यांच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश होण्याकरिता या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मयत पदू देहू कोंडीलकर यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे मे.कोर्टात योग्य ते आदेश करतील याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१६ माहे सप्टें सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**प्रथमवर्ग न्याय.पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**प्रथमवर्ग न्याय.पनवेल**



मा.गोडसे मॅडम

वकील : श्री.आनंदा पोळ

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर ठाणे यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.८२८/२०२१
नि.नं.८
ने.ता.११/११/२०२१

श्री.गणेश परमेश्वर मेनन
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.हेमंत डी–९, न्यू मंडाला बीएआरसी,
अणुशक्ती नगर, मुंबई–४०००९४ — अर्जदार

विरुद्ध

१) मिस मंजुभाषिणी गणेश मेनन
वय : २१ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
२) मिस.पूर्वा गणेश मेनन
वय : १६ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) मास्टर.चेतन गणेश मेनन
वय : १४ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.हेमंत डी–९, न्यू मंडाला बीएआरसी,
अणुशक्ती नगर, मुंबई–४०००९४ — सामनेवाले

वरील अर्जदार यांची पत्नी व सामनेवाले यांची आई कै.श्रीमती.मोहना गणेश मेनन यांचे दि.२४/१२/२०१९ वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले. मयत कै.श्रीमती.मोहना गणेश मेनन यांचे नावे असलेली मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**फ्लॅट नं.३०७, तिसरा मजला, सी विंग, आदित्य कॉम्प्लेक्स,**
**भूखंड क्रमांक २१, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९,**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**बिल्टअप एरिया ४५.१२ चौ.मी.**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



सिडको शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**विषय – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादन करणेबाबत.**

१. याद्वारे सूचना देण्यात येते कि, खाली दर्शविलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मौजे–गव्हाण ता. पनवेल, जि. रायगड येथील जमीन नवी मुंबई प्रकल्पाअंतर्गत संपादन करण्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र मुबई विभाग मुंबई क्र. LAQ/C/(I)/२६६ दि.१०.०८.१९७२ मध्ये प्रसिद्ध आहे. तसेच नवी मुंबई विकास प्रकल्पासाठी सिडको महामंडळाची नवनगर विकास प्राधिकरण म्हणुन नेमणूक करण्यात आलेली आहे.

२. दिनांक ०१.०१.२०१४ पासून सन –२०१३ च्या न्याय/योग्य नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहत (ज्याच्या पुढे नवीन केंद्रीय अधिनियम असा उल्लेख करण्यात आला आहे) त्या कायद्यातील कलम १०८ पोटकलम (१) (२) अन्वये राज्य शासनाच्या कायद्यान्वये किंवा धोरणान्वये संपादीत व्हावयाच्या जमिनीचा देय मोबदला व पुनर्वसनाचे लाभ, नवीन अधिनियमाच्या तरतुदीपेक्षा एकंदरीत जास्त देय असतील तर संबंधित जमीन धारकाची अथवा धोरणानुसार मोबदला व लाभ स्विकारण्यास संमती असेल तर असा जास्त मोबदला आणि पुनर्वसनाचे लाभ देय असलेल्या कायद्याच्या अथवा धोरणाच्या तरतुदी लागू होतील अशी तरतूद आहे.

३. राज्य शासनाच्या नवीन कायद्याप्रमाणे देय असलेल्या जमिनीच्या संपादनापोटी मोबदला व पुनर्वसनाच्या लाभापेक्षा संबंधित धारकांना एकंदरीत जास्त लाभदायक तरतूदी देणारे धोरण महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवी मुंबई विकास प्रकल्पाकरीता लागू करण्यात आले आहे, तसेच सदर भूसंपादन प्रक्रिया महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) अन्वये राबविण्यास मान्यता प्रदान केली आहे व उपरोक्त संपादनाखालील जमिनीबाबत शासन धोरणान्वये देय असलेला मोबदला व लाभ यासाठी संबंधीत भूधारकांची संमती असल्यास सदर धोरणानुसार जमिन संपादनापोटी भूधारकांना २२.५% योजनेअंतर्गत विकसित भूखंड देण्याचे धोरण स्विकारले आहे.

४. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/ प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये निश्चित केलेली नुकसान भरपाई व इतर लाभ भूधारकांना एकंदरीत फायदेशिर होत असतील व संबंधित भूधारकांनी सदर लाभ स्विकारल्यास भूधारकांना भूसंपादन अधिनियमाद्वारे वाढीव मोबदल्याबाबत कोणत्याही प्रकारची न्यायालयात अर्ज करण्याची मुभा राहणार नाही.

५. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/३३१७/ १२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) नुसार भूसंपादन प्रक्रीया राबवून जाहीर करण्यात येणाऱ्या निवाड्याप्रमाणे अंतिमत: सर्व घटकासह भूधारकांना देय होणाऱ्या २.५ चटई निर्देशांकासहीत १०% विकसित जमीन व १२.५% भू–वाटप योजनेनुसार पात्र असणाऱ्या भूधारकांना १.५ चटई निर्देशांकासहीत विकसित जमीन अनुज्ञेय राहील. त्यानुसार बाधित भूधारकांस भूसंपादनाच्या मोबदल्यात अनुज्ञेय व देय विकसित जमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | विकसित जमिनीची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | नुकसानभरपाईच्या रोख रकमेऐवजी विकसित जमीन | १०% |
| २ | १२.५% भू–वाटप योजना नुसार पात्र भूधारकांस | १२.५% |
| | **एकूण मिळणारी विकसित जमीन २२.५%** | **२२.५%** |

६. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) मधील तरतुदीनुसार व या अधिनियमाच्या कलम १५२ व ११६ नुसार मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिनीबाबत मालक/कुळ व इतर हितसंबंधित यांनी जमीन संपादनापोटी व उपरोक्त शासन निर्णय २ व ३ नुसार देय असणारा २२.५% विकसित भूखंड मिळण्यास संमती असल्यास संमतीपत्रे किंवा हरकत असल्यास लेखी स्वरूपात ही सूचना मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), यांचे कार्यालय, १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर – ४००६१४. यांच्या कार्यालयात सादर करावीत.

७. परिशिष्ट मध्ये नमूद करण्यात आलेले गावनिहाय सर्व्हे क्रमांकापैकी जे सर्व्हे क्रमांक पडताळणीच्या प्रक्रियेमध्ये CRZ, कांदळवन बाधित निर्दशनास येतील तसेच ज्या सर्व्हे क्रमांकाच्या ७/१२ सदरी इतर अधिकार रकान्यात प्रचलित कायदयानुसार हस्तांतरणास बंदी अशी नोंद असेल अशा सर्व्हे क्रमांकासंदर्भात प्रकरण निहाय निर्णय घेण्यात येईल.

#### परिशिष्ट

| अ. क्र. | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. संगणकीकृत ७/१२ | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर.) | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर.) | सिडको महामंडळाच्या ताब्यातील क्षेत्र | संपादनासाठी प्रस्तावित क्षेत्र (हे.आर.) | गाव नमुना नं. ७/१२ प्रमाणे कब्जेदारांची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण | पनवेल | २९३/३ | ०–२८–०० | ०–२८–०० | – | ०–२८–०० | किशन पी. नेनवाणी |
| २ | गव्हाण | पनवेल | २९१ | ०–११–०० | ०–११–०० | – | ०–११–०० | विनोद किशन नेनवाणी |
| ३ | गव्हाण | पनवेल | २९०/६ | ०–१२–१० | ०–१२–१० | – | ०–१२–१० | रेणु किशन नेनवाणी<br>प्रकाश किशन नेनवाणी |

**(सतिशकुमार खडके)**
**अप्पर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२२९/२०२१–२२